Ref. No. - तारीख-

प्रति,

सर्व संस्थाप्रमुख / प्राचार्य / संचालक,
संगणक टंकलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

**विषय - ETH व सावित्रीबाई फुले पुणे विदयापिठाचे संयुक्त अभ्यासक्रम आपल्या संगणक प्रशिक्षण केंद्रात चालविणेबाबत...**

सन्मानिय केंद्र चालक,

आपणास कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, ETH Ltd व महाराष्ट्र संगणक आणि शैक्षणिक विकास केंद्र (MCADC) ह्यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राच्या शहर, तालुका व गाव पातळीवर संगणक केंद्रांची नियुक्ती सुरु आहे. ह्या अनुषंगाने MCADC च्या माध्यमातून अध्यक्ष, प्राचार्य प्रकाश कराळे सर यांच्या समन्वयाने हा प्रकल्प आपल्या संगणक केंद्रावर राबवण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

आपल्या केंद्राची ETH मध्ये नोंदणी होण्यापूर्वी, ETH मार्फत देण्यात आलेल्या Business Proposal / माहिती व MCADC मार्फत कळविण्यात आलेल्या योग्य त्या मार्गदर्शक सूचना आपण अभ्यासाव्यात. त्या अनुषंगाने आपले संगणक केंद्र ETH कडे नोंदवून, ETH चे उपक्रम राबवण्याची संधीचा स्विकार करुन आपण ETH व MCADC च्या उपक्रमात सहभागी व्हावे .

ह्या उपक्रमांतर्गत, ETH व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत राबवण्यात येणारा अभ्यासक्रम MCADC परिवारातील संगणक केंद्रामार्फत यशस्वीरीत्या राबवण्यासाठी व आपल्या केंद्राची व्यवसायवृद्धी होण्याकरिता, MCADC ने हा ऐच्छिक उपक्रम आपल्या साठी उपलब्ध करून दिलेला आहे.

ETH मार्फत आपल्या व्यवसाय वृद्धीसाठी Digital Campus (DC - Light), EG-Acadmey सारखे इतर उपक्रम सुद्धा भविष्यात वेळोवेळी सादर केले जातील, जेणेकरून आपल्याला व्यवसाय वाढीच्या संधी उपलब्ध होतील. आपल्या संस्थेसाठी मॉडयुअल ३ मधुन रक्कम रुपये ३८०० केंद्र नोंदणी शुल्क मध्ये eth मार्फत केंद्रातील पहिले पाच विदयार्थी शुल्क फ्री असतील. सोबत अधिकृत केंद्राचा ३*६ बॅनर, तीन पुस्तके त्यात १.Speaking २.MS-Office व ३.DTP किंवा Financial Accounting या व्यतिरिक्त उर्वरित पुस्तके १३० रुपये शुल्क भरुन मिळतील याप्रमाणे विचार केल्यास फक्त ७३० रुपये खर्चामध्ये संगणक संस्थांना प्राधान्याने मान्यता मिळणार आहेत. आणि मान्यता प्राप्त संस्थेत सावित्रीबाई फुले पुणे विदयापिठाचे ३ व ६ महिने मुदतीचे १९ कोर्सेस व ETH चे वरील कोर्सेस MCADC च्या माध्यमातुन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

वरील उपक्रम किंवा अभ्यासक्रमाची सक्ती कुठल्याही केंद्रास नाही, परंतु खऱ्या अर्थाने व्यवसाय वृद्धी चा मानस असलेले केंद्र व आपल्या केंद्र्यात इतर काही संगणक अभ्यासक्रम साठी पर्यायी अभ्यासक्रम म्हणून राबवणारे, ह्या सर्व संस्थांचा विचार करून ज्येष्ठ संगणक शास्त्रज्ञ मा. श्री. विजयजी भटकर

यांच्या मार्गदर्शनाच्या माध्यमातून घडलेल्या ETH LTD व MCADC परिवार चे मार्गदर्शक माजी शिक्षण संचालक मा. श्री. महावीर माने सर, अध्यक्ष प्रकाश कराळे सर ह्या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली आपण हा उपक्रम महाराष्ट्र व गोवा राज्याच्या कानाकोप-यात यशस्वीरित्या राबवू, याची आम्हां सर्वांना खात्री आहे.

आपण आपले केंद्र ETH कडे नोंदणी करत असताना खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे -

१. मान्यता कामी www.eth.co.in / www.mcadc.in वरील माहितीचे अवलोकन करावे.
२. आपले आधार कार्ड
३. आपले PAN कार्ड
४. MSCE / MSSDC चे प्रमाणपत्र / संस्था कोड.
५. केंद्र संचालकाचा फोटो.
६. अधिकृत केंद्राचे मॉडयुअल १,२,३ पैकी ठरवुन दिलेले शुल्क.
७. संगणक प्रशिक्षण केंद्राचे प्रतिज्ञापत्र.

eth.co.in वेबसाईट वरील ॲप्लीकेशन फॉर्म ऑनलाईन परिपुर्ण भरुन सबमिट करावा व नोंदणी शुल्क eth किंवा MCADC बँक खात्यात RTGS/NEFT द्वारे जमा करावे व त्याची पोहोच व ॲप्लीकेशन फॉर्मची छायांकीत प्रत केंद्राचे जिल्हा समन्वयक (District Co-ordinator) यांच्याकडे जमा करावेत.

हा उपक्रम यशस्वीपणे आपल्या केंद्रात राबविण्याकामी आपण स्विकार कराल अशी खात्री बाळगतोत व आपणास पुढील कार्यासाठी मन:पुर्वक शुभेच्छा.

आपले विश्वासु

प्रकाश कराळे
अध्यक्ष, MCADC

शशांक हिवरकर
MD तथा CEO, eth

सोबत खालील documents, माहिती व अभ्यासण्यासाठी जोडत आहोत.

१. ETH Ltd चे Business Proposal / माहिती.
२. संगणक केंद्र Application Form.
३. ETH करिता संगणक केंद्राचे प्रतिज्ञा पत्र व परिशिष्ट १.